# <u>प्रेसनोट</u>

दि.२०/०७/२०२२

## हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस उपनिरीक्षकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कोरेगांव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ७२/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - सागर दिलीप पोमण, वय - ३४ वर्षे<br>पद - पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक - हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर (अटक करण्यात आली ) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- ( पन्नास हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५०,०००/- ( पन्नास हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- २०/०७/२०२२.

ठिकाण :- कोरेगांव पार्क, लेन नंबर ७

थोडक्यात माहिती :- तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी अर्जानुसार तक्रारदार यांचे आर्थिक व्यवहारातील पैसे परत मिळवून देण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक पोमण यानी लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता तक्रारदार यांनी त्यांची फसवणूक झालेबाबत केलेल्या तक्रारी अर्जानुसार त्यांचे आर्थिक व्यवहारातील येणे असलेले पैसे परत मिळवून देण्यासाठी हडपसर पोलीस स्टेशनच्या नेमणुकीतील लोकसेवक पोलीस उप निरीक्षक सागर पोमण यानी तक्रारदार यांचेकडे ५० हजार रूपयांची लाचेची मागणी करून ती लाच रक्कम दि.१९/०७/२०२२ रोजी रात्री १०.४० वा.चे दरम्यान स्वीकारल्यावर त्यास ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.